**PRESS MONITOR**

Publication : Sakal
Edition : Pune
Date : January 15, 2017

**Headline**: Moonbow air and water purifiers

# मूनबो एअर अँड वॉटर प्युरिफायर



पुणे, ता. १४ : सॅनिटरी वेअर बाजारपेठेतील आघाडीच्या एचएसआयएल लि. या कंपनीने विविध ग्राहककेंद्री उत्पादनांच्या माध्यमातून महाराष्ट्रात विस्तार केला आहे. 'हिंदवेअर' ब्रँडसाठी प्रसिद्ध असलेल्या या कंपनीने 'मूनबो' या ब्रँडच्या रूपाने एअर आणि वॉटर प्युरिफायर विभागात प्रवेश केला आहे. ग्राहकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीसाठी मूनबो प्युरिफायर बाजारात दाखल करण्यात आले आहे. पुढील तीन वर्षांत बाजारपेठेतील १२ ते १३ टक्के हिस्सा काबीज करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. देशभरात पसरलेल्या आपल्या संपर्क जाळ्याच्या माध्यमातून उपनगरे, छोटी शहरे आणि द्वितीय श्रेणीतील शहरांमधील बाजारपेठेत विस्तार करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. मूनबो एअर प्युरिफायरमध्ये 'प्युरी ५' तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. या पाच पातळ्यांमध्ये चालणाऱ्या शुद्धीकरण प्रक्रियेत आसपासच्या हवेतील प्रदूषित घटक नष्ट करून हवा शुद्ध केली जाते. मूनबो वॉटर प्युरिफायरमध्ये पाच प्रकार उपलब्ध आहेत. हे वॉटर प्युरिफायर हेक्साप्युअर तंत्रज्ञान आणि स्मार्ट युझर इंटरफेससह येतात, असे कंपनीचे कंझ्युमर प्रॉडक्ट्स व्यवसायप्रमुख राकेश कौल यांनी सांगितले.